Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 Seminar – 2609141
Fax : +91-231-2691533, 2693294 & 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन : इपीबीएक्स – 2609000 सेमीनार 2609141
फॅक्स : +91-231-2691533, 2693294 व 2692333 Website : www.unishivaji.ac.in
email : pgseminar@unishivaji.ac.in

संदर्भ क. :– शिवाजी वि./सेमिनार वि./नियतकालिक स्पर्धा/व्हीआरवी/101

दि. 17/07/2023

20 JUL 2023

VIVEKANAND COLLEGE INWARD No. 475 Date 21/7/2023 KOLHAPUR

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व, संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था.

विषय : शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन 2021–2022 निकाल.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सन 2021–2022 मधील शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत बिगर व्यावसायिक व व्यावसायिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सृजनशीलतेची जोपासना व्हावी, त्यांच्यातील सृजनशीलता अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी यास्तव महाविद्यालयांमधून प्रतिवर्षी नियतकालिके प्रकाशित केली जातात आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठामार्फत प्रतिवर्षी नियतकालिक स्पर्धा आयोजित केली जाते. या अंकातून वाङ्मय निर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या आणि महाविद्यालयांकडून उत्तम दर्जाचे नियतकालिक प्रकाशित व्हावे या हेतूने शिवाजी विद्यापीठाची ही योजना इ.स. 1970 पासून सुरु आहे. आता या योजनेचे नामाभिदान "**शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा**" असे आहे.

सन 2021–2022 या स्पर्धेसाठी **43** बिगर व्यावसायिक व **13** व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला होता. या नियतकालिकांचे परीक्षण करून खालील महाविद्यालयांना सर्वसाधारण विजेते पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा सन 2021 –2022 निकाल**

**सर्वसाधारण विजेता पुरस्कार – बिगर व्यावसायिक गट**

| विजेता कमांक | महाविद्यालयाचे नाव | संपादकांचे नाव | नियतकालिक नांव |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | मुधोजी महाविद्यालय,फलटण,जि.सातारा. | प्रा. लक्ष्मीकांत वेळेकर | उदय |
| व्दितीय क्रमांक | विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. | डॉ. आरिफ शौकत महात | विवेक |
| तृतीय क्रमांक | सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड जि. सातारा | प्रा. डॉ. दिलीपकुमार कसबे | सद्‌गुरू |

**व्यावसायिक महाविद्यालये**

| विजेता कमांक | महाविद्यालयाचे नाव | संपादकांचे नाव | नियतकालिक नांव |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर, जि. कोल्हापूर. | डॉ.बी.टी.साळोखे | होरिझोन |
| व्दितीय क्रमांक | आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी आष्टा जि. सांगली. | प्रा.एस.एस.मोहिते | ज्ञानदारंभ |
| तृतीय क्रमांक | डी.के.टी.ई चे टेक्स्टाईल अॅण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिटयूट, इचलकरंजी, जि. कोल्हापूर. | प्रा. आर.डी.शिर्के | अंबर |

तसेच सन 2021–2022 साठी 88 विद्यार्थ्यांना व 166 विद्यार्थिनींना अशी मिळून एकूण 254 वैयक्तिक पारितोषिके प्राप्त झाली आहेत. तसेच नियतकालिक स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या महाविद्यालयातील वैयक्तिक पारितोषिक, पात्र विद्यार्थ्यांची नावे, प्रशस्तिपत्र व धनादेश याबाबतची माहिती स्वतंत्ररित्या आपल्या महाविद्यालयास कळविणेत येतील, याची कृपया नोंद घेणेत यावी. सदर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमासंबंधी नंतर पत्राव्दारे कळविण्यात येईल.

आपला विश्वासू,

प्रभारी कुलसचिव